# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः25.08.2025** **वारःसोमवार**

---

1. भारत-फिजी द्विपक्षीय संबंध दृढ करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज फिजीचे पंतप्रधान सितिवेनी राबुका यांना भेटणार
2. गगनयान मोहिम ही आत्मनिर्भर भारतासाठी नवा अध्याय-संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांचे गौरवेद्गार
3. या मोहिमेसाठी महत्वाच्या पॅराशुट आधारित डिसीलरेशन यंत्रणेची यशस्वी चाचणी
4. युवा जागतिक अजिंक्यपद तिरंदाजी स्पर्धेत शर्वरी शेंडेला सुवर्णपदक आणि
5. हिमाचलप्रदेशात पावसामुळे जनजीवन विस्कळीत, पुढील काही दिवस वायव्येसह, उत्तर भारतात मुसळधार पावसाचा इशारा

**फिजी-पंतप्रधान**

भारत-फिजी दरम्यानचे द्विपक्षीय संबंध दृढ करण्याच्या उद्देशानं पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत फिजीचे पंतप्रधान सितिवेनी राबुका यांच्याशी चर्चा करणार आहेत. त्यांचं काल तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आगमन झालं. त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी सुलुएती राबुका तसंच वरिष्ठ शिष्टमंडळ आहे. केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांनी काल संध्याकाळी त्यांची भेट घेतली. या दौऱ्यादरम्यान ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेतील अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात दिली आहे. सर्व क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यासाठी विविध विषयांवर चर्चा होण्याची अपेक्षा आहे.

**पंतप्रधान-गुजरात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. यावेळी शहरी विकास, उर्जा, रस्ते आणि रेल्वे या क्षेत्रातील विविध पाच हजार चारशे कोटी रुपयांच्या विकासप्रकल्पांची पायाभरणी अहमदाबादमधील खोडलधाम मैदानावर त्यांच्या हस्ते आज होणार आहे. यामध्ये 65 किमी लांबीच्या महेसाणा-पालनपूर रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण, कलोल-काडी-काटोसन रोड आणि बेचराजी-रानुज रेल्वे मार्गांचे गेज रूपांतरणआदी प्रकल्पांचा समावेश आहे. तसंच काटोसन रोड आणि साबरमती दरम्यान एका प्रवासी रेल्वेलाही हिरवा झेंडा दाखवतील आणि बेचराजी इथून मालवाहू रेल्वेसेवेचा शुभारंभ करतील. याव्यतिरिक्त, पंतप्रधान विरमगाम-खुदाद-रामपुरा रस्त्याच्या रुंदीकरणाचे उद्घाटन करतील आणि अहमदाबाद-मेहसाणा-पालनपूर मार्गावर सहा पदरी भुमीगत मार्गाची पायाभरणी करतील. हंसलपूर इथं हायब्रिड बॅटरी इलेक्ट्रोड्सच्या स्थानिक उत्पादनाचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. या बॅटरीज 100 देशांमध्ये निर्यात होणार आहेत.

**गगनयात्री-राजनाथ सिंह**

भारत आपल्या पहिल्या मानवी अंतराळ उड्डाण मोहीम, गगनयान साठी पूर्णपणे तयार असून हा आत्मनिर्भर भारताच्या प्रवासातील नवीन अध्याय आहे, असा विश्वास संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल नवी दिल्लीत व्यक्त केला. गगनयात्री कॅप्टन शुभांशु शुक्ला, प्रसंत बलकृष्णन नायर, अजित कृष्णन, आणि अंगद प्रताप यांच्या विशेष सन्मान समारंभात सिंह बोलत होते. भारत अंतराळाला केवळ संशोधनाचं क्षेत्र म्हणून पाहत नाही, तर ते अर्थव्यवस्था, सुरक्षा, ऊर्जा, आणि मानवतेचे भविष्यातील द्वार आहे, असं सिंह म्हणाले.

**इस्त्रो**

भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात इस्त्रोनं गगनयान मोहिमेसाठी महत्वाची असलेली पहिली एकत्रित एअर डॉप चाचणी काल यशस्वी केली. पॅराशुट आधारित डिसीलरेशन यंत्रणा यामुळे प्रमाणित होण्यास मदत होणार आहे. इस्त्रो, हवाईदल, डीआरडीओ, नौदल आणि तटरक्षक दल यांनी संयुक्तपणे ही चाचणी घेतली. गगनयान मोहिमेअंतर्गत अंतराळवीरांना स्वदेशी बनावटीच्या यानातून अवकाशात पाठवणे आणि परत आणण्यात येणार आहे. यासाठी ही एअर ड्रॉप प्रणाली कौशल्यपूर्ण असणे आवश्यक आहे.

**DRDO**

संरक्षण संशोधन आणि विकास प्राधिकरण अर्थात DRDO ने एकत्रित हवाई संरक्षण शस्त्र प्रणालीची चाचणी यशस्वी केली. ओडीशाच्या किनाऱ्यावरुन ही चाचणी घेण्यात आली. या यंत्रणेत विविध स्तरावर काम करण्याची क्षमता आहे. जमिनीवरुन हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्र प्रणाली, कमी पल्ल्याच्या हवाई संरक्षण प्रणाली, क्षेपणास्त्र आणि लेसर-आधारित आणि निर्देशित ऊर्जा शस्त्र यांच्यासाठी काम करणाऱ्या यंत्रणेत वापरली जाणार आहे.

**अमितशहा**

देशाची संसद आणि विधानसभांमध्ये विवेकी वर्तन, साधक-बाधक चर्चा आणि नियमांचं पालन झालं, तरच लोकशाही बहरते, असं मत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केलं. नवी दिल्लीत काल अखिल भारतीय विधिमंडळ पीठासीन अधिकाऱ्यांच्या दोन दिवसांच्या परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. देशाच्या केंद्रीय कायदे मंडळाचे पहिले अध्यक्ष म्हणून विठ्ठलभाई पटेल यांनी पदभार स्वीकारल्याच्या घटनेला 100 वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्तानं ही परिषद दिल्ली विधानसभेत आयोजित करण्यात आली आहे. लोकप्रतिनिधी जेव्हा व्यक्तिगत किंवा पक्षीय हितांपेक्षा 'राष्ट्र सर्वोपरी' हे मूल्य जोपासातील तेव्हाच लोकशाहीची प्रतिष्ठा राखली जाईल. विधिमंडळं ही जनतेचा आवाज पोहोचवण्याचं माध्यम बनायला हवीत, असं शहा म्हणाले.

**रशिया-राजदूत**

भारत आपल्या राष्ट्रीय हिताचे रक्षण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील राहील अशी ग्वाही रशियातील भारताचे राजदूत विनय कुमार यांनी काल दिली. एका रशियन वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. तेलखरेदी संदर्भात व्यवहारिक विचार करुन निर्णय घेतले जातील असंही अमेरिकेने लादलेल्या आयातशुल्कासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी स्पष्ट केलं. अमेरिकेचा हा निर्णय अन्याय्य असल्याचंही ते म्हणाले. भारताचे ऊर्जा धोरण आपल्या नागरिकांसाठी विश्वासार्ह तेलपुरवठा सुनिश्चित करण्याचे आहे. भारत-रशिया व्यापार परस्पर हितसंबंध आणि बाजारपेठेतील घटकांवर आधारित आहे. अमेरिका आणि युरोपीय राष्ट्रांसह इतर देशही रशियासोबत व्यापार सुरू ठेवतात. याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

**युध्दबंदी**

रशिया आणि युक्रेन यांनी 146 युध्दबंदींची काल देवाणघेवाण केली. संयुक्त अरब अमिरातीच्या मध्यस्तींनंतर या नागरिकांची सुटका करण्यात आली. अशी माहिती रशियाच्या संरक्षण दलाकडून देण्यात आली आहे. सुटका झालेल्या रशियन नागरिकांना बेलारुसमध्ये मानसिक आणि वैद्यकीय मदत देण्यात येत आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर झेलेन्स्की यांनी संयुक्त अरब अमिरीतीचे आभार मानले आहेत. 2022 मध्ये रशियाने केलेल्या कारवाईदरम्यान या नागरिकांना पकडण्यात आलं होतं. गेल्या 23 जुलै रोजी इस्तांबूल इथं रशिया आणि युक्रेनदरम्यान शांततेसाठीची तिसरी फेरी पार पडली होती. त्यावेळी बाराशे नागरिकांची सुटका करण्यासंदर्भात सहमती दर्शवण्यात आली होती. दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरिल रामाफोसा यांनी रशिया-युक्रेन शांतता प्रयत्नांवर चर्चा करण्यासाठी युरोपियन नेत्यांशी दूरध्वनीवरून चर्चा केली. रामाफोसा यांनी झेलेन्स्की, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन आणि फिनिशचे अध्यक्ष अलेक्झांडर स्टब यांच्याशी चर्चा केली आहे.

**मांडवीय**

2047 पर्यंत, भारत जगातील पहिल्या पाच क्रीडा राष्ट्रांमध्ये स्थान मिळवण्याची अपेक्षा क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी काल व्यक्त केली. अहमदाबाद इथं झालेल्या राष्ट्रकुल भारत्तोलन अजिंक्यपद स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला संबोधित करताना ते बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने क्रीडा क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे आणि या क्षेत्रात अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत असे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

**पुजारा**

भारतीय फलंदाज चेतेश्वर पुजारा यानं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्व प्रकारांमधून काल निवृत्ती जाहीर केली. आपल्या कारकीर्दीबद्दल आपण समाधानी असून योग्य वेळी थांबत आहोत, असं पूजारानं निवृत्तीची घोषणा करताना म्हटलं आहे.

**तिरंदाजी**

कॅनडातील विनीपेग इथं झालेल्या युवा जागतिक अजिंक्यपद तिरंदाजी स्पर्धेत महाराष्ट्रातील मुलींनी अभिमानास्पद कामगिरी केली आहे. शर्वरी शेंडे हिनं काल 18 वर्षांखालील मुलींच्या गटात वैयक्तिक सुवर्ण पदक पटकावलं. सध्या सुरू असलेल्या या स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावणारी शर्वरी ही दुसरी भारतीय महिला स्पर्धक ठरली आहे. या आधी शनिवारी चिकिता तनीपार्थी हिनं 21 वर्षांखालील गटात सुवर्ण पदक मिळवलं होतं. अत्यंत अटीतटीनं झालेल्या सामन्यात शर्वरीनं आपल्या किम येवोन या दक्षिण कोरियाच्या प्रतिस्पर्ध्यावर 6-5 अशी मात केली  या स्पर्धेत प्रितिका प्रदीप हिने दोन रौप्य पदकं, तर गाथा खडके आणि शर्वरी शेंडे यांनी कास्य पदक पटकावलं आहे.

**हिमाचल-पाऊस**

हिमाचल प्रदेशातील अनेक भागात मुसळधार पाऊसाचा जोर सुरूच आहे, नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाल्याने पूर, ठिकठिकाणी पाणी साचणं आणि भूस्खलनामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झालं आहे. राज्य आपत्कालीन केंद्राकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, भूस्खलनामुळे दोन राष्ट्रीय महामार्ग आणि 482 रस्ते वाहतूकीसाठी बंद आहेत. अनेक भागातील वीजपुरवठाही प्रभावित झाला आहे, 941 जनित्र आणि 95 पिण्याच्या पाण्याच्या योजना विस्कळीत झाल्या आहेत. हवामान खात्याने या महिन्याच्या 30 तारखेपर्यंत राज्यात मुसळधार पाऊसाची शक्यता वर्तवली आहे. दहा जिल्ह्यांमध्ये पुढील 12 तासांत बिलासपूर, हमीरपूर, कांगडा, किन्नौर, कुल्लू, मंडी, शिमला, सिरमौर, सोलन आणि उना मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा आहे. या पार्श्वभूमीवर सात जिल्ह्यांमधील शैक्षणिक संस्थांमध्ये आज सुट्टी जाहीर करण्यात आली आहे

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने पुढील दोन दिवस देशाच्या वायव्य भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. उद्यापर्यंत गुजरात, ओडिशा, राजस्थान आणि उत्तराखंडमधील काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, बिहार, छत्तीसगड, किनारी आंध्र प्रदेश, हरियाणा, पंजाब, दिल्ली, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीरमधील काही ठिकाणी उद्यापर्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.